शुक्रवार, दि. ३० मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २९४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282






जालना शहरात गुरुवार (दि २९) रोजी सायंकाळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. यामुळे काही ठिकाणी झाडे पडली. तसेच रस्त्यांवर ठिकठिकाणी पाणी साचले. (छाया -अनिल व्यवहारे)

## गायीची कत्तल, गो तस्करी तसेच गोरक्षकांवर होणारे हल्ले थांबवा

### बजरंग दलाचे पोलीस अधिक्षकांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** बकरी ईदच्या पार्श्वभुमीवर गायीचे रक्षणासाठी पोलीस अधिक्षकासोबत चर्चा संपुर्ण महाराष्ट्रा मध्ये गोवंश हत्या बंदी कायदा तथा अन्य कायदे लागु असतांना देखील येणाऱ्या बकरीईद ला मोठ्या प्रमाणात होणाऱ्या गायीची कत्तल रोखण्यासाठी व गो तस्करी तसेच गोरक्षकांवर होणारे जीवघेणे हल्ले रोखणेबाबत गुरुवार (दि २९) रोजी बजरंगदल जालनाच्या शिष्टमंडळाने पोलीस अधिक्षकांची भेट घेत निवेदन दिले.



दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, येणाऱ्या ०७ जुन २०२५ रोजी बकरी इद हा सण साजरा होणार आहे. या पार्श्वभुमीवर जालना जिल्ह्यात विशेषतः जालना शहरामध्ये मंगल बाजार, दाना बाजार, बरवार गल्ली, जुना जालना येथे गोवंशाची हत्या होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरवर्षी बकरी ईदच्या दिवशी या भागात मोठ्या प्रमाणात गोवंशाची हत्या होत असते. सदरील भागात ज्या पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येतो त्या पोलीस स्टेशनला सदर गुन्ह्याची माहिती देवुन देखील गोवंशाची कत्तल करणाऱ्या गुन्हेगारांवर कोणतीही कार्यवाही होत नाही. कोणतेही कलम लावले जात नाही.

महाराष्ट्र सरकाने २०२५ या वर्षी गोमातेला राज्यमातेचा दर्जा दिलेला पान २ वर

## खदाणीत पडून दोन मित्रांचा मृत्यू

**नांदेड -** जिल्ह्यातील हदगांव तालुक्यातील गारगव्हान येथे खदानीत बुडून दोन मित्रांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. १५ वर्षीय संघर्ष परघने आणि १३ वर्षीय निखिल वाढवे अशी मृत मुलांची नावे आहेत. नेवरी गावातील संघर्ष परघने हा लग्नासाठी मामाच्या गारगव्हाण या गावी आला होता. मात्र, मामाचं गाव त्याच्यासाठी काळ ठरलं. या घटनेनंतर कुटुंबीयांनी आक्रोश केला, असून गावातून हळहळ व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थ आणि पान २ वर

## युवा आदर्श

### महादोष ...

नाले तुंबले तुडुंब
प्रशासनाचा दोष
अखंड शिवीगाळ
उसळे उद्रेकी रोष
मिडियाबाई कॅमेरे
टिपे फक्त आक्रोश
जुने फोटो दाखवी
कुप्रसिद्ध मदहोश
फिरेगरार व्हाटसॅप
बातमी विघ्नसंतोष
नाल्या उतरे गुदमरे
का कामगार बेहोश
कामे वेळेत परिपूर्ण
प्रमाणपत्रात संतोष
बिले अर्जंट कामाची
ठेकेदार भरी कोष
तुंबाई चित्रे दाखवी
विरोधकां येई जोश
आम्ही होतो तत्पर
दणदणीत उच्चैर्घोष
करतो कोण कचरा
प्रश्न करी कंठ शोष
जबाबदार आपणचं
अवघ्या विश्वा दोष

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# वाहतुक शाखा उघड डोळे बघ नीट...
# ॲटो रिक्षा धावताहेत सहा-सहा सीट...

**दीपक शेळके**

**जालना -** शहर हद्दीत ॲटो रिक्षा चालकांची मनमानी सुरु असून वाहतुक शाखेचे याकडे सोयीस्कर दुर्लक्ष होत आहे. शहरातील विविध रस्त्यावर या ॲटोरिक्षा प्रवासी क्षमतेपेक्षा अधिक पाच ते सहा प्रवासी बेदिक्त बसवून धावतांना दिसून येत आहे. जालना परमिट असलेल्या रिक्षांसह इतर जिल्ह्यातील परमिटेड ॲटो ही शहरातून धावताहेत याकडेही वाहतुक शाखेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे लक्ष नाही. त्यामुळे वाहतुक शाखा उघड डोळे बघ नीट... इतर जिल्ह्यातील रिक्षांसह शहरात ॲटो रिक्षा धावताहेत सहा-सहा सीट...

रिक्षा चालकांच्या मनमानीमुळे शहरातील वाहतुकीला बेशिस्त आली आहे. प्रवाशांनी अचानक हात दाखवला की जागेवरच रिक्षा थांबते. पाठीमागून येणारे वाहनाची कोणतीही तमा बाळगत नाहीत. अपघात होईल याची भीती नाही. प्रवाशांना अरेरावी होते. विशिष्ट ठिकाणी रिक्षा स्टॉप नाहीत. कुठेही कसेही वाहतुकीला अडथहा करून रिक्षा थांबताहेत. रिक्षातून सहा-सहा प्रवासी वाहतुक क्षमतेपेक्षा अधिक वाहतुक होते यावर कुठलीही कारवाई होत नाही. बस स्थानक, रेल्वे स्टेशन, स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, टांगा स्टॅण्ड, मंठा चौफुली, नुतन वसाहत आदी भागात तर रिक्षा स्टॉप व्यतिरिक्त अस्ताव्यस्त रस्त्यावर कोठेही रिक्षा थांबलेल्या दिसताहेत. यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे.

शहरातील विविध भागात जसे की, जुना जलना शनिमंदीर, नविन जालना पाणीवेस, बसस्थानक, सिंधी बाजार, सराफा, जुने अलंकार सिनेमा, टांगास्टॅण्ड या ठिकाणी होणाऱ्या वाहतुक कोंडीला ॲटो रिक्षा चालकांच्या मनमानी कारभार कारणीभूत असल्याचे दिसून येत आहे.

बॅचबिल्ला, ड्रेसकोड हा नियमच शहरात लागू नाही की काय अशी स्थिती आहे. नंबरप्लेट, इंडिकेटर, सुस्थितीत नाहीत. अनेक रिक्षा स्क्रॅप आहेत. शहरात एकूण किती परमिट आहेत आणि किती रिक्षा धावताहेत याचा ताळमेळ वाहतुक शाखेकडे आहे का? एकंदरीत वाहतुक शाखा आणि ॲटो रिक्षा चालकांचे हितसंबंध यासाठी कारणीभूत आहेत का? याचा शोध घेणे गरजेचे आहे. याबाबीकडे आरटीओसह जिल्हा प्रशासन लक्ष देईल का? असा प्रश्न सर्वसामान्यांमधून उपस्थित होतो आहे.

### ॲटो चालकाची प्रवाशाला दमदाटी

छत्रपती संभाजीनगर येथून परतून सिंदखेड राजा चौफुली परिसरात जाण्यासाठी बस स्थानक परिसरात ॲटो रिक्षा शोधणाऱ्या एका प्रवाशास आवाज देत एका ॲटो चालकांने तेथे जाण्यासाठी चाळीस रुपये सांगितले. त्यावर प्रवाशाने तीस रुपये म्हटले होते. हो नाही करत ॲटो चालकांने बसण्यास सांगितले. म्हणजेच तीस रुपये ठरले. त्या ॲटोत एकूण पाच जण बसले होते. एक राममंदीर जवळ उतरला दोन शिवाजी पुतळा, चौथा मंठा चौफुली आणि पाचवा शेवटचा प्रवाशी सिंदखेड राजा चौफुली येथे उतरला. रिक्षातून उतरल्यानंतर ॲटो चालकांने चक्क चाळीस रुपये मागितले. तीस मध्ये ठरल्यानंतरही चाळीस मागितल्याने प्रवाशी संतापला. मात्र, ॲटो चालकांने चक्क शिवीगाळ करत प्रवाशावर धावून गेला नाईलाजाने प्रवाशाने चाळीस रुपये ऑनलाईन पे केले. अशा पद्धतीने ॲटो रिक्षा चालक अधिकचे प्रवासी वाहतूक तर करताहेत मात्र, प्रवाशांवर शिवीगाळ करत धावून जात थेट मारहाण करण्याचा प्रयत्न करत आहेत. याबाबीकडे आता कोण लक्ष देणार?




हिच ती ॲटो ज्याच्या चालकाने केली अरेरावी... याचे परमिट आहे की नाही हा मोठा विषय, इंडिकेटर नाही. बॅचबिल्ला, ड्रेस कोड तर विचारू नका? पाच -पाच सीट घेऊन बेदिक्त धावला...

## पावसाळ्यापूर्वीची कामे युद्धपातळीवर पूर्ण करा - आमदार खोतकर

### विविध ठिकाणी महापालिकेच्या कामांची व नाल्यांची केली पाहणी

**जालना । प्रतिनिधी -** आगामी पावसाळ्यात नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी जालना महानगरपालिकेच्या वतीने सुरू असलेल्या पावसाळी पूर्वतयारी कामांची गुरुवार (दि २९) आमदार अर्जुनराव खोतकर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. शहरातील विविध भागांत सुरू असलेल्या नालेसफाई, गटार दुरुस्ती, पाणी वाहतूक मार्ग स्वच्छता आदी कामांची माहिती त्यांनी अधिकाऱ्यांकडून घेतली व आवश्यक त्या सूचना दिल्या.

या पाहणी दौऱ्यात त्यांनी राजाबाग शेरसवार दर्गा जवळील नाला काजीपुरा, कट्टीपुरा या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे शहरप्रमुख विष्णू पाचफुले, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, बाबा मोरे, सागर पाटील यांच्यासह महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपुत, उपायुक्त नंदा चव्हाण, स्वच्छता निरीक्षक पंडित पवार, सतिश पाचगे, गुल्लापेल्ली, सोयब खान यांच्यासह महापालिकेचे अधिकारी कर्मचारी व शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

पाहणीदरम्यान आमदार खोतकर यांनी महापालिका प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिले की, पावसाळ्यात सामान्य जनतेला त्रास होऊ नये, नाल्यांचे पाणी रस्त्यावर साचू नये, जलतरणीची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी काटेकोर नियोजन व वेळेत काम पूर्ण होणे अत्यंत आवश्यक आहे.

त्यांनी शहरातील काही नाल्यांजवळ थांबून कामाची गुणवत्ता तपासली आणि कार्यरत कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधत योग्य मार्गदर्शन केले. नागरिकांच्या समस्यांबाबत त्वरित निर्णय घेऊन कार्यवाही करण्याची जबाबदारी महापालिकेने गांभीर्याने पार पाडावी, असे निर्देश त्यांनी दिले. या दौऱ्यामुळे प्रशासनाला नवी ऊर्जा मिळाली असून, कामांची गती आणि गुणवत्ता दोन्ही वाढण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. नागरिकांमध्येही आमदार खोतकर यांच्या या सक्रिय सहभागामुळे समाधानाची भावना व्यक्त होत आहे. शिवसेनेच्या नेतृत्वाखाली जालना शहर अधिक सुरक्षित, स्वच्छ व नियोजित पावसाळा अनुभवेल, असा विश्वास या पाहणी दौऱ्यानंतर नागरिकांत निर्माण झाला आहे.



# संपादकीय

## ‘शुभ’मन पर्वास सुरुवात

भारतीय क्रिकेट संघ पुढील महिन्यात इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार आहे. २० जून पासून सुरू होणाऱ्या या दौऱ्यात भारतीय क्रिकेट संघ ५ कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. या दौऱ्यापूर्वी भारताचे आधारस्तंभ असलेले अनुभवी रविचंद्रन अश्विन, रोहित शर्मा आणि विराट कोहली या तिघांनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारली. भारताचे आधारस्तंभ असलेल्या या त्रिमूर्तीने जवळपास दीड दशके भारतीय क्रिकेटची धुरा वाहिली त्यामुळे या तिघांच्या निवृत्तीनंतर पहिल्यांदाच भारतीय क्रिकेट संघ कसोटी मालिका खेळतोय ते ही इंग्लंड सारख्या बलाढ्य संघाविरुद्ध आणि ते ही त्यांच्याच देशात त्यामुळे या दौऱ्यात भारतीय संघात कोणते खेळाडू असतील ? संघाचा कर्णधार कोण असेल? अश्विन, रोहित आणि विराट या तिघांची जगा कोण भरून काढणार ? असे अनेक प्रश्न क्रिकेट चाहत्यांना पडले होते. या प्रश्नाचे उत्तर निवड समितीने नुकतेच दिले. निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी इंग्लंड दौऱ्यासाठी १८ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. हे करताना त्यांनी नव्या कर्णधाराचीही घोषणा केली. भारतीय कसोटी संघाचा नवा कर्णधार म्हणून युवा फलंदाज शुभमन गिलची निवड केली. युवा शुभमन गिल हाच भारताच्या कसोटी संघाचा नवा कर्णधार असेल अशी अपेक्षा होती आणि ती खरी ठरली. मी माझ्या ' भारतीय कसोटी संघाचा संक्रमणकाळ' या लेखात तसे भाकीत वर्तवले होते ते खरे ठरले. शुभमन गिलच्या गळ्यात कर्णधारपदाची माळ टाकून निवड समितीने त्याच्यावर मोठा विश्वास टाकला आहे अर्थात या विश्वासाला तो पात्र ठरेल का ? याचे उत्तर आगामी काळात मिळेलच मात्र त्याच्यावर ही कामगिरी सोपवून निवड समितीने सकारात्मक पाऊल टाकले आहे हे मान्यच करावे लागेल. शुभमन गिल आता २५ वर्षाचा आहे. अवघ्या २५ व्या वर्षी कर्णधारपदाची माळ गाळ्यात पडलेला शुभमन गिल हा पहिला खेळाडू नाही या आधी पतौडी, सचिन तेंडुलकर आणि रवी शास्त्री यांनी २५ व्या वर्षी किंवा त्याआधीच कर्णधारपद भूषवले आहे. सचिनकडे तर अवघ्या २१ व्या वर्षीच ही जबाबदारी आली होती. शुभमन गिलने मागील सात वर्षात जी कामगिरी केली त्या आधारेच त्याला भारतीय संघाचे कर्णधारपद मिळाले आहे. मागील सात वर्षातील त्याची कामगिरी चांगलीच नाही तर अविश्वसनियन अशी आहे. या सात वर्षात त्याने फलंदाज म्हणून तर छाप पाडलीच आहे पण कर्णधार म्हणूनही त्याने स्वतःला सिद्ध केले आहे. २०१८ मध्ये त्याच्या नेतृत्वाखाली १९ वर्षाखालील भारतीय संघाने विश्वविजेतेपदाला गवसणी घातली होती. या संघाचे नेतृत्व ज्याप्रकारे केले होते ते पाहून तेंव्हाच काही जाणकारांनी तो भविष्यात भारताच्या मुख्य संघाचा कर्णधार असेल असे भाकीत केले होते. ते भाकीत आज खरे ठरले. केवळ १९ वर्षाखालील संघाचीच नव्हे तर आयपीएलमध्ये गुजरात टायटन्स या संघाचे नेतृत्व केले ते पाहता तो भारतीय संघाचे नेतृत्व करण्यास पात्र असल्याचे सिद्ध झाले. सध्या चालू असलेल्या आयपीएलमध्ये त्याने त्याच्या कुशल नेतृत्वाने गुजरात संघाला प्ले ऑफ मध्ये प्रवेश मिळवून दिला. या दरम्यान त्याने फलंदाजीतही चमक दाखवत ६०० च्या वर धावा काढल्या. याच कामगिरीच्या जोरावर त्याला भारतीय कसोटी संघाचे कर्णधारपद मिळाले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आता २० जूनला तो पहिल्यांदा भारतीय संघाचा कर्णधार म्हणून मैदानात उतरेल त्या क्षणापासून भारतीय क्रिकेटमध्ये! ' शुभ' मन पर्व सुरू होईल. शुभमन गिलची भारतीय संघाच्या कर्णधारपदी निवड झाली असली तरी त्याच्यासाठी हे पद सांभाळणे सोपे नाही. भारतीय संघाचा कर्णधारपदाचा मुकुट हा काटेरी असतो. तो मुकुट धारण करणे म्हणजे साक्षात निखाऱ्यावरून चालण्यासारखे आहे त्यात शुभमन गिलला जो संघ दिला आहे तो नवखा आहे. या संघात अनेक नव्या खेळाडूंचा समावेश आहे. यातील बहुतेक खेळाडूंना इंग्लंडमध्ये खेळण्याचा अनुभव नाही. बुमरा, पंत आणि के एल राहुल याच खेळाडूंना इंग्लंडमध्ये खेळण्याचा अनुभव आहे त्यामुळे या नव्या खेळाडूंना घेऊन इंग्लंड सारख्या खडतर दौऱ्यावर जाऊन तिथे जिंकणे हे मोठ्या जिकिरीचे काम शुभमनला करावे लागणार आहे. अर्थात या संघाकडे गमावण्यासारखे काही नाही मात्र कमावण्यासाठी खूप काही आहे. शुभमन गिलने जर या नवख्या खेळाडूंकडून त्यांच्यातील सर्वोत्तम खेळ करून घेतला आणि आपल्या कुशल नेतृत्वाने भारतीय संघाला विजय मिळवून दिला तर मोठा इतिहास घडेल. अर्थात इतिहास घडवण्याची क्षमता या संघात आणि नव्या कर्णधारात आहे यात शंका नाही. भारतीय संघास आणि भारतीय संघाचा नवा कर्णधार असलेल्या शुभमन गिल यांस खूप खूप शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# बदलत्या काळानुसार ढोर समाजाने संघटीत होवून आपला विकास साधला पाहिजे - माजी आमदार ज्ञानराज चौगुले

## समाजाअंतर्गत जनगणना करण्यासाठी समिती स्थापन



**सोलापूर । प्रतिनिधी -** गेल्या अनेकवर्षापासून ढोर समाज कातडी कमावणे हा पारंपारिक व्यवसाय करत असताना सवर्णांकडून समाजाला अस्पृश्य केले होते. अनेक अन्याय अत्याचार सहन करणारा ढोर समाज एकत्र येवून संघटीत झाला पाहिजे आणि बदलत्या काळानुसार आपली प्रगती साधली पाहिजे असे प्रतिपादन उमरगा तालुक्याचे माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी केले.

एका हॉटेलमध्ये महाराष्ट्र राज्य ढोर समाज कृतीशील कार्यकर्ता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वीज मंडळाचे निवृत्त मुख्यअभियंता लक्ष्मीदास सोनकवडे होते. तर राष्ट्रवादी कॉग्रेसचे सोलापूर शहर अध्यक्ष सुधीर खरटमल यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कक्कय्या महासंघाचे उपाध्यक्ष ॲड जांबुवंतराव सोनकवडे, डॉ. पीपी पोळ,डॉ. दिनेश कदम, डॉ. रायप्पा कटके, पुंडलिक खरटमोल,लक्ष्मण होटकर,अनिल पोळ, मुकुंद सोनटक्के,किशोर कवडे, गणेश नारायणकर,सुदेश व्हटकर,राहुल सोनवणे, प्रकाश व्हटकर तसेच राज्यातील विविध जिल्ह्यातून समाजबांधवांनी सहभाग घेतला होता.

शाहु , फुले, आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांना मानणारा हा ढोर समाज आहे. संघर्ष हा ढोर समाजाला नवीन नाही त्यातून आजच्या काळातही नैसर्गिक न्यायहक्कासाठी अनेकदा संघर्ष करावा लागत आहे. त्यासाठी समाजातील सर्वच संघटना, समाज मंडळांनी एकत्र येवून सरकार दरबारी आपल्या मागण्या मांडल्या पाहिजेत असेही चौगुले यांनी सांगितले.

मागासलेला ढोर समाज अस्पृश्य आहे असे वर्षानुवर्षे समजणार्यांनी आता अनुसुचित जाती मध्ये सहभागी होवून मागासवर्गीय समाजाचे हक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. याबाबत जनजागृती होणे आवश्यक असल्याने त्यासाठी लक्ष्मीदास सोनकवडे यांनी पुढाकार घेतला आणि बैठक घेवून समाजात चांगले काम केले आहे. असे सुधीर खरटमल यांनी सांगितले.

आगामी काळात संपूर्ण देशात जनगणना होणार आहे त्यापुर्वी समाजातील सर्वच बांधवांची जनगणना करणे गरजेचे आहे. असे आपल्या अध्यक्षीय भाषणातून लक्ष्मीदास सोनकवडे यांनी सांगितले आणि त्यानुसार जनगणना समितीचे गठण करण्यात आले.

आगामी काळातील जात वर्गीकरणामध्ये ढोर समाजाची काय भुमिका असावी याबाबत मुंबईहून आलेले तज्ञ रविंद्र शिंदे यांनी सविस्तर अभ्यासपूर्ण माहिती दिली. वर्ग एक, वर्ग दोन पासून न्यायाधीश या पदावर आजही एस सी एस टीच्या जागेवर खुल्या वर्गातील लोकांना स्थान दिले जाते. असे परखड मत जांबुवंतराव सोनकवडे यांनी मांडले. तर पुर्वाश्रमीच्या अस्पृश्य ठरवलेल्या जातीत जंगमासारखे स्पृश्य जातीला अनुसुचित जातीत स्थान देवून अस्पृश्य समाजाचे नैसर्गिक न्याय हक्क डावलून अन्यायाने आरक्षणाचे फायदे लाटले जात आहेत. यासाठी सर्वांनी एकत्र येवून संघर्ष केला पाहिजे असे पी पी पोळ यांनी सांगितले.

ढोर समाजाचे अखिल भारतीय स्तरावर सर्व्हेक्षण होवून जनगणना कशी करावी याबाबत माहिती तंत्रज्ञान अभियंता ओंकार व्हटकर यांनी सविस्तर सांगितले. प्रारंभी सच्चिदानंद व्हटकर आणि ॲड. विद्या कटकधोंड यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक सदाफुले यांनी केले. तर आभार राजेश कटकधोंड यांनी व्यक्त केले. या संपूर्ण कार्यशाळेत साहित्यिक बाबुराव इंगळे, विनायक होटकर, सुनिल व्हटकर, तिपण्णा इंगळे, मुन्ना कटके, विनोद होटकर, जितेंद्र होटकर, सागर नारायणकर, सुरेश कावळे, श्रीगणेश शिंदे यांनी चर्चेच्या माध्यमातून सहभाग नोंदवला.

# जीवनात सर्वोच्च स्थान प्राप्तीची महत्वाकांक्षा जोपासा

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची १११ वी शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजी नगर । प्रतिनिधी -** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १६ मे १९३८ ला चिपळूण येथे म्हटल्याप्रमाणे जीवनात सर्वोच्च स्थान प्राप्तीची महत्वाकांक्षा जोपासा. या विधानाच्या ८७ व्या वर्धापनानिमित्त १११ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा १८ मे २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, समाज जीवनात कार्यरत सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील विविध पक्ष संघटनांनी व्यापक दृष्टीकोन ठेवून पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण अशा सर्व भागात अस्तित्वात असणाऱ्यांशी समन्वयाने कार्य केले पाहिजे. यात काही वक्त्यांनी शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा याची जाणीव करून दिली आहे. मात्र आपण हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, जे काही व्यक्त केले जाईल ते संदर्भासहीत असावे. तर ९ मार्च १९२४ ला मुंबई च्या दामोदर हॉल येथे संपन्न झालेल्या बैठकीत मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, Educate, gitate and Organise अर्थात सुशिक्षित करा, संघर्ष करा (चेतवा) आणि संघटीत करा. जे पुढे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ ला स्थापन केलेले पहिले संघटन म्हणजे बहिष्कृत हितकारिणी सभेचे ब्रीदवाक्य ठरले होते. या संदेशाचे मर्म समजून घेऊन जसेच्या तसे प्रस्तुत करावे. जेणेकरून त्याचे दूरगामी परिणाम पहायला मिळतील. श्रोत्यांनी कुठल्याही कार्यक्रमला सुरुवातीपासून तर शेवटपर्यंत ऐकले तरच त्यांचे त्या अनुषंगाने समर्पक मत तयार होऊ शकेल. खोती पद्धत नष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली भूमिका पार पाडली परिणामी २९ सप्टेंबर १९५० ला कायद्याने ही बंद करण्यात आली. करिता शोषण मुक्त समाज निर्माण करण्यासाठी आवश्यक ते शिक्षण सर्व नागरिकांना दिले पाहिजे. म्हणून २५ डिसेंबर १९२७ ला महाड सत्याग्रहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, छोटा उद्देश ठेवणे, हा गुन्हा आहे. तर पुढे जाऊन १६ मे १९३८ ला जीवनात सर्वोच्च स्थान प्राप्तीची महत्वाकांक्षा जोपासा असे म्हटले होते. याची जाणीव ठेवून सदरील विधानाच्या ८७ व्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान प्रासंगिकता समजून घेण्यासाठी आपण चर्चा आयोजित केली आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना स्वाभीमानी पँथर जनरल कामगार संघटनेचे संस्थापक सचिव सोमनाथ महापुरे म्हणाले की तरुण, युवक चळवळीत अग्रेसर होण्यासाठी आपण विचार स्थानांतराची प्रक्रिया राबविली पाहिजे. जेणेकरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे या चळवळीचा कारवाँ पुढे घेऊन जाता आला नाही तर किमान मागे तरी जाऊ देऊ नये. ही अपेक्षा पूर्णत्वास नेण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे. आपण सर्व जण विविध जातीत विभाजित असल्यामुळे सर्वांनी आपापल्या जातीत जन्माला आलेले महापुरुषांच्या वाटण्या केल्याने शत्रूनी आपल्या चटण्या केल्या आहेत.

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना जिल्हा व सत्र न्यायालयाचे एडव्होकेट एम. एस. धिवार म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्ञानरूपी संदेशातून प्रेरणा घेऊन ते संदेश जनसामान्यांपर्यंत प्रसारीत करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

वतनाच्या इनामी जमिनी धन दांडग्यांनी लाटल्यात. त्याकाळी शेतात गवताचे छत निर्माण केले जायचे, त्यावर पण कर लावला जात असे. शेती कसायला पैसा द्यायचे पण उत्पन्न आल्यावर सारे घेऊन जायचे एवढ्या मोठ्या प्रमाणावर शोषण व्हायचे.

याप्रसंगी राहुल मेश्राम म्हणाले की, हा विषय १९३८ चा असला तरी पुढील काळात त्यांनी भारताचे संविधान लिहिले आहे. त्यामुळे आपण आज उभे आहोत. विलास कटारे म्हणाले की, जिथे अशाप्रकारच्या कार्यशाळा आयोजित केल्या जातात, तिथे समस्या निर्मूलनासाठी चर्चा होत असतात. हे वज्जीगणाचे खास वैशिष्ट्य होते, जे कार्यशाळेने अवलंबिले आहे. माणूस केंद्र बिंदू ठेवून पुढे चालत राहिले पाहिजे. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, त्या काळात खोती पद्धत फोफावली होती. शेतसारा वसूल करणा-यांना खोत म्हटले जात होते. प्रतीक पंचशील म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतिहास नोंद घेईल एवढे महान कार्य केले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भुषण गवई यांनी या विधानाची पूर्तता केली आहे.

प्रास्ताविक व सुत्रसंचालन प्रतीक पंचशील यांनी केले. सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले.

या कार्यशाळेला प्रतीक पंचशील, एड. एम. एस. धिवार, उद्योजक मिलिंद बागूल, विलास कटारे, सोमनाथ महापुरे, धनराज कापडणे, राहूल मेश्राम, सोहेल पटेल इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

# मिल्लत नगर परीसरात गोर गरीबांचे अतिक्रमण काढणार नाही

## वाजेद पठाण यांनी प्रश्न लावला मार्गी

**जालना -** शहरातील मिल्लत नगर परीसरात डीपी रोड चे काम सुरू असल्यामुळे काही गोरगरिबांचे अतिक्रमन काढले जात होते. मात्र कांग्रेसचे माजी नगरसेवक वाजेद पठाण यांनी पुढाकार घेत जालना जिल्हायाचे खासदार कल्याण काळे आणि मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांची भेट घेऊन प्रश्न मार्गी लावला. गोर गरीबांचे अतिक्रमण काढु नये किंवा त्या नागरिकांना पर्याय काढून द्या या साठी वाजेद पठाण यांनी खासदार कल्याण काळे आणि मनपा आयुक्त खांडेकर यांच्याकडे विनंती केली आहे.या वर योग्य उपाय करु असे आश्वासन मनपा अयुक्तांनी दिले आहे..

शहरातील हाटेल लेक व्ह्यू मध्ये खा.कल्याण काळे आणि पालिकेचे आयुक्त यांच्या ऊपस्थिती मध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी जालन्याचे खासदार कल्याण काळे, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, कॉंग्रेस अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अब्दुल रफिक, माझी सभापती अकबर खान, माजी नगरसेवक वाजेद खान, वसीम भाई यांच्यासह मिल्लता नगर भागातील नागरिकांची उपस्थिती होती.

## पान १ वरुन

### खदाणीत पडून ...

स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत दोघांच्या मृतदेह बाहेर काढण्याची शोधमोहीम हाती घेतली होती.

संघर्ष आणि त्याचा मित्र निखिल वाढवे हे दोघे शेताकडे जात असताना पावसामुळे रस्त्यात चिखल झाला होता. चालताना दोघांपैकी एकाचा पाय घसरून तो खदानीत पडला, त्याला वाचवण्यासाठी गेलेला दुसरा मित्र देखील या दुर्घटनेत बुडाला. या घटनेने गारगव्हान गावावर शोककळा पसरली आहे. दुसरीकडे सातऱ्यात नदीच्या बंधाऱ्यात वाहून गेलेली व्यक्ती तब्बल ३६ तासांनी मृतावस्थेत आढळून आली.

### गायीची कत्तल ...

आहे. असे असुन देखील गोवंशाची सर्रास कत्तल चालु आहे व बकरी ईदला गोवंशाची खुप मोठ्या प्रमाणावर कत्तल होणार आहे तसेच सध्या गोवंशाची कत्तली साठी खुप मोठ्या प्रमाणात वाहतुक सुरु आहे सदरची वाहतुक करताना गोवंश अक्षरक्षः कोंबुन गाडी मध्ये अतिशय निर्दयी पणे भरले जातात. हे थांबविण्यात यावे त्याच बरोबर संपुर्ण जिल्ह्यात विशेषतः जालना शहरात गोवंशाच्या कत्तलीवर संपुर्ण प्रतिबंध लावावा., गोवंशाची कत्तल किंवा बेकायदेशीर वाहतुक करणाऱ्यावर कडक कायदेशीर कार्यवाही करावी., बकरी ईदच्या पार्श्वभुमीवर जालना जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनला गोवंश हत्या रोखण्या करीता विशेष पोलीस पथक स्थापन करण्याचा आदेश द्यावा., गोवंशाची कत्तली करता होणारी बेकायदेशीर वाहतुक थांबवण्याकरीता प्रत्येक ठिकाणी नाकाबंदी करावी अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. मागण्या मान्य न झाल्यास प्रशासनाच्या विरोधात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा ईशाराही निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे. निवेदनावर बजरंग दलाचे जिल्हा सहसंयोजक अर्जुन डळाळे यांची स्वाक्षरी होती.

# जालना जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने आयोजित निवड चाचणी स्पर्धा बदनापूर येथे संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय हौशी महासंघाच्या निर्देशानुसार जालना जिल्हा कबड्डी असोसिएशन तर्फे १८ वर्षाखालील मुले व मुलींसाठी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा दिनांक ६ जून ते १० जून २०२५ या कालावधीत पुणे येथे आयोजित केल्या आहेत त्यासाठी जालना जिल्हा कबड्डी असोसिएशनचा संघ निवडण्यासाठी रविवार दि २५/०५/२०२५ रोजी पाथ्रीकर कॅम्पस बदनापूर जिल्हा जालना या ठिकाणी कबड्डी निवड स्पर्धेचे आयोजन केले होते या स्पर्धेचे उद्घाटन असोसिएशनच्या अध्यक्षा श्रीमती माधवी काळे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनपर भाषणामध्ये माधवीताई काळे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना खेळाडूंनी खेळाचे महत्व आणि खेळाडूंची एकजूट तसेच सांघिक कामगिरीला महत्त्व दिले पाहिजे. असे प्रतिपादन केले कबड्डी या खेळामध्ये मी बेस्ट असून उपयोग नाही तर आम्ही बेस्ट असलो पाहिजे असा मूलमंत्र त्यांनी खेळाडूंना दिला.या स्पर्धेतील एकूण आठ संघांपैकी जिजामाता क्रीडा मंडळ किनगाव या संघाने अजिंक्यपद पटकावले तर उपविजेता संघ काळोखा माता क्रीडा मंडळ डुकरी पिंपरी हा ठरला मुलींच्या संघामध्ये जिल्हा परिषद क्रीडा प्रबोधिनी जालना हा एकमेव संघ सहभागी झाल्यामुळे तोच संघ विजयी घोषित करण्यात आला. यावेळी असोसिएशनच्या वतीने खेलो इंडिया राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी झालेला खेळाडू विरेंद्र मंडलिक याचा सत्कार करण्यात आला. निवड समिती सदस्यामध्ये राष्ट्रीय खेळाडू रवींद्र ढगे, दिनेश वाघ, बाबासाहेब मंडळे, संजय येळवंते, यांनी काम पाहिले तर पंच म्हणून हरी वाडेकर,अजय काळवणे,कृष्णा जाधव,गणेश ढगे , विठ्ठल दिवटे, रोहिणी बिनीवाले यांनी काम पाहिले विजयी संघामध्ये अनिल गायकवाड, ज्ञानेश्वर चव्हाण, राजेंद्र बोंबले,दुर्गेश गायकवाड,हरी ओम गायकवाड,वीरेंद्र मंडलिक,दिनेश शिंदे यांचा समावेश आहे तर संघाचे मार्गदर्शक रोहित बिन्नीवाले व अजय काळवणे हे आहेत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सुनील जायभाये तर प्रमुख पाहुणे प्रा सोपानराव तेलगड हे होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय येळवंते यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा डॉ रामदास निहाळ यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संघटनेचे सदस्य राहुल वाहुळे, बाबासाहेब मंडळे, रवींद्र ढगे,गणेश ढगे,परमेश्वर जाधव,सुनील रोडे,कृष्णा जाधव,दिनेश वाघ,विठ्ठल दिवटे व सुंदर थोरात यांनी प्रयत्न केले

# अहिल्यादेवींचे सुशासन, सामाजिक समता आणि पर्यावरण संवर्धनाचे विचार आजही आपल्याला दिशा दाखवतात - आमदार बबनराव लोणीकर

## परतुर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती निमित्त महिला सन्मान पुरस्कार वितरण सोहळा २०२५ उत्साहात संपन्न





**परतूर । प्रतिनिधी** - महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक थोर व्यक्तिमत्त्वांनी आपल्या कार्याने आणि विचारांनी समाजाला प्रेरणा दिली आहे. त्यापैकी एक म्हणजे पुण्यश्लोक लोकमाता अहिल्याबाई होळकर होत्या. अठराव्या शतकात पुरुषप्रधान समाजात स्वतःच्या बुद्धिमत्तेने, धैर्याने आणि प्रजाहितदक्षतेने माळवा प्रांतावर राज्य करणाऱ्या अहिल्याबाईंनी नारीशक्तीचा आदर्श घालून दिला. अहिल्याबाईंनी निष्पक्ष आणि प्रजाहितदक्ष प्रशासन प्रस्थापित केले. गावोगावी पंच नेमून त्वरित न्यायदानाची व्यवस्था केली. करप्रणाली सौम्य करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

डोंगरी भागातील भिल्ल आणि गोंड आदिवासींना कर वसुलीचा अधिकार देऊन त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले. त्यांनी स्वतःच्या मुलाला रथाखाली वासराला चिरडल्याबद्दल शिक्षा ठोठावली, ज्यामुळे त्यांच्या न्यायनिष्ठेची ख्याती पसरली. पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त आज परतूर येथील गजानन मंगल कार्यालयात महिला सन्मान पुरस्कार वितरण सोहळा २०२५ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद जालना आणि पंचायत समिती परतूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्याने अहिल्यादेवींच्या प्रेरणादायी कार्याचा गौरव करताना आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. आ. बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ, उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड तहसीलदार श्रीमती प्रतिभा गोरे गटविकास अधिकारी राजेश तांगडे, महिला व बालविकास प्रकल्पाधिकारी रमेश कोळेकर भाजपा तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे , रमेश भापकर संपत टकले अशोकराव बरकुले , बद्रीनारायण ढवळे प्रवीण सातोनकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या माळवा प्रांतातील प्रजाहितदक्ष आणि निष्पक्ष प्रशासनाचा गौरव करण्यात आला. त्यांनी राबवलेली निःपक्षपाती न्यायव्यवस्था, शेतकऱ्यांसाठी सौम्य करप्रणाली, आणि भिल्ल-गोंड आदिवासींशी मैत्रीपूर्ण संबंध यांचे स्मरण करण्यात आले. त्यांनी विहिरी, तलाव, घाट, रस्ते, धर्मशाळा आणि मंदिरांचे बांधकाम करून सामाजिक आणि पर्यावरणीय विकासाला चालना दिली. सती प्रथेला विरोध, महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण आणि सर्वधर्मसमभावाच्या विचारांनी त्यांनी सामाजिक समतेचा आदर्श घालून दिला. महेश्वर येथील विणकर आणि कारागिरांना प्रोत्साहन देऊन त्यांनी उद्योगाला चालना दिली, ज्याची साक्ष आजही महेश्वरी साड्यांच्या रूपाने दिसते. असे यावेळी आपल्या भाषणात आमदार बबनराव लोणीकर यांनी नमूद केले.

पुढे बोलतांना आमदार लोणीकर म्हणाले की, अहिल्यादेवींच्या कार्याला आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी आहे तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे सुशासन, सामाजिक समता आणि पर्यावरण संवर्धनाचे विचार आजही आपल्याला दिशा दाखवतात. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजात समानता आणि प्रगती साध्य करू शकतो. अहिल्याबाईंनी सर्वधर्मसमभावाचा आदर्श ठेवला. त्यांनी काशी, अयोध्या, द्वारका, नाशिक, पंढरपूर येथे मंदिरे बांधली आणि सोमनाथ, काशीविश्वेश्वर, महाकाळेश्वर मंदिरांचा जीर्णोद्धार केला. मशिदी, दर्गे आणि विहार यांचेही बांधकाम केले. मराठी कवी मोरोपंत, शाहीर अनंतफंदी आणि संस्कृत विद्वान खुशालीराम यांना आश्रय दिला. त्यांचा ग्रंथसंग्रह, ज्यात ज्ञानेश्वरी, रामायण आणि पद्मपुराण यांसारखी हस्तलिखिते होती, हा त्यांच्या विद्वत्तेचा पुरावा आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

सोहळ्याच्या मुख्य आकर्षण ठरलेल्या महिला सन्मान पुरस्कार २०२५ अंतर्गत जालना जिल्ह्यातील महिला आणि स्वयंसेवी संस्थांनी महिला सक्षमीकरण, शिक्षण, आणि बाल कल्याण क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. पुरस्कारप्राप्त व्यक्तींमध्ये ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या, शिक्षण क्षेत्रातील शिक्षिका आणि बाल कल्याणासाठी योगदान देणाऱ्या संस्थांचा समावेश होता. प्रत्येक पुरस्कारप्राप्त व्यक्तीला सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी श्री. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अहिल्यादेवींच्या पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक समतेच्या कार्याला आधुनिक काळात लागू करण्याचे आवाहन केले. अहिल्यादेवींच्या विचारांनी प्रेरित होऊन आपण आजच्या आव्हानांना सामोरे जाऊ शकतो. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे असे स्पष्ट केले.

महिला सक्षमीकरणासाठी जिल्हा परिषदेच्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती दिली. तसेच, स्थानिक प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्रितपणे काम करून सामाजिक विकासाला गती द्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यावेळी म्हणाले. या सोहळ्याला परतूर आणि जालना जिल्ह्यातील शेकडो नागरिक, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, आणि स्थानिक शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. स्थानिक महिलांनी अहिल्यादेवींच्या कार्यातून प्रेरणा घेऊन स्वावलंबन आणि सामाजिक बदलासाठी पुढे येण्यासाठी प्रत्येक महिलेने संकल्प करावा असे मत तहसीलदार श्रीमती प्रतिभा गोरे यांनी व्यक्त केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करण्याचे आवाहन केले. हा सोहळा केवळ अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीचा उत्सव नसून, त्यांच्या विचारांना आणि कार्याला आधुनिक काळात जीवंत ठेवण्याचा एक यशस्वी प्रयत्न ठरला आहे. या कार्यक्रमाने जालना जिल्ह्यातील महिलांना प्रेरणा देऊन सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणाला चालना दिली आहे. अहिल्यादेवींच्या आदर्शांना अनुसरून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा संदेश या सोहळ्याने दिला. असल्याचे देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

यावेळी उपसभापती संभाजी वारे रवींद्र सोळंके बंडू मानवतकर रंगनाथ येवले गजानन लोणीकर शिवाजी पाईकराव बंकटराव सोळंके बाबाराव थोरात सावता काळे सुरेश काळे दादाभाऊ लरोर किरण अंभोरे महिला आघाडी भाजपा तालुकाध्यक्ष छायाताई गोरबांड डॉ लता पुरी श्रीमती माधुरी देशमुख मंगला कोरडे अंजली कोळकर शोभा गोरे अर्चना गरड मंजुषाताई बरकुले शशिकलाताई वाकडे अमृता ठाकूर सोनाली लिपणे स्वाती कुलकर्णी अलका गोरे यांची उपस्थिती होती तर या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष डी बी काळे युवराज सिंह परदेशी प्रशांत लाळे दत्ता राऊत शेख शफी नकले साहेब तुमचं नाव काय प्रवीण नाकले यांनी विशेष परिश्रम घेतले यांच्यासह मोठ्या संख्येने महिलां , विविध गावचे सरपंच ग्रामसेवक भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# विश्वकर्मा समाज संघटनेच्या जालना जिल्हाध्यक्षपदी बालाजी सांगुळे

**परतूर । प्रतिनिधी** - जालना जिल्हा विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेच्या जालना जिल्हाध्यक्षपदी बालाजी सांगुळे यांची निवड करण्यात आली आहे.



जालना येथे समाज संघटनेची नूतन कार्यकारिणी निवडण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.बैठकीच्या अध्यक्षस्थानी नागोरावजी पांचाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. जालना जिल्हाध्यक्षपदी सर्वानुमते बालाजी सांगुळे यांची निवड करण्यात आली.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नागोरावजी पांचाळ, राज्यसचिव पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.याच बैठकीत संघटनेची

परतूर तालुका कार्यकारिणी देखील घोषित करण्यात आली. परतूर तालुकाध्यक्षपदी पांडुरंग चौधरी यांची निवड करण्यात आली. यावेळी सुशील सांगुळे,अंकुश सांगुळे,दयानंद सांगुळे, वैजनाथ सांगुळे, अनंता सांगुळे, अनिल सांगुळे यांची उपस्थिती होती. बालाजी सांगुळे यांच्या निवडी बद्दल समाजाच्या सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त पाहेगावात विविध उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**जालना । प्रतिनिधी** - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त आज पाहेगाव (ता. जालना) येथील जोगेश्वरी माता मंदिर परिसरात विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महाआरती, शंखनाद, भक्तिगीते, स्वच्छता अभियान तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्यांपैकी महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी आपल्या प्रभावी भाषणातून उपस्थितांना प्रेरणा दिली.

भाजपा जालना महानगरचे जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या एक अष्टपैलू, दूरदृष्टी असलेल्या, लोकहितासाठी आयुष्य वेचणाऱ्या राजमाता होत्या. त्यांनी गड किल्ले, घाट, मंदिर, विहिरी, धर्मशाळा, शिक्षण संस्था यांची उभारणी करून समाजाचा विकास साधला. त्या काळात स्त्रियांना नेतृत्वाची संधी मिळणे कठीण होते, पण त्यांनी लोकाभिमुख राज्यकारभारातून एक आदर्श निर्माण केला. आज त्यांच्या विचारांचा वारसा आपण पुढे नेण्याची गरज आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत नव्या पिढीने शिक्षण, स्वच्छता, सामाजिक न्याय आणि महिलांचा सन्मान या बाबतीत पुढाकार घ्यावा. गावपातळीवर असे कार्यक्रम हे समाजमन जागृत करणारे असतात आणि तेच आपल्याला हवे आहे. असे हि ते म्हणाले.



कार्यक्रम प्रसंगी कपिल दहेकर, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, श्री.सुनील पवार, वसंत शिंदे, बद्रिनाथ भसांडे, डॉ. तुकाराम कळकुंबे, परसराम तळेकर, गोवर्धन कोल्हे, मुकेश चव्हाण, रामजी शेजुळ, सतीश केरकळ, गजानन खरात, राजाराम जाधव, पांडुरंग आहेरकर, दौलत भुतेकर, नागेश अंभोरे, बाबासाहेब चाळगे, गोपाल चौधरी, दत्ता जाधव, अर्जुन मोहिते, लहू राठोड, राज जाधव, संदीप चव्हाण, कैलास मोहिते, रायमलजी (पुण्य नगरी), लासिराम राठोड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन या कार्यक्रमाला यशस्वी केले. संपूर्ण परिसरात भक्तीमय आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले होते.

# माळीपुरा, दत्त मंदिर व जामा मस्जिद परिसरात कचरा कुंडीची नागरीकांची मागणी

## उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर मनपाने कारवाई करावी

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील माळीपुरा दत्त मंदिर तसेच जामा मस्जिद या मुख्य परिसराला जोडणाऱ्या रस्त्यावर नागरिक उघड्यावर कचरा फेकत असल्याने येथील रहिवाशांना याचा त्रास होत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने या कचऱ्यामधून प्रचंड दुर्गंधी पसरत असून डास मच्छर याची उत्पत्ती वाढत आहे. त्यामुळे रोगराई पसरण्याची भीती या परिसरातील नागरिकांना होत आहे. सदर ठिकाणी कचराकुंडी नसल्याने परिसरातील नागरिक उघड्यावर कचरा फेकत आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात कचरा साचत आहे त्याचे विपरीत परिणाम नागरिकांना भोगावे लागत आहेत. म्हणून महानगरपालिकेने याकडे जातीने लक्ष देऊन उघड्यावर कचरा फेकणाऱ्या नागरिकांवर कारवाई करावी



तसेच या ठिकाणी कचराकुंडी बसवून वेळोवेळी कचरा उचलावा अशी मागणी शेख वसीम रजा. व शेख इरफान तसेच परिसरातील नागरिकांच्या वतीने होत आहे. आज दिनांक २९ गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता माध्यमांशी बोलताना माळीपुरा परिसरातील समाजसेवक शेख वसीम आणि ईरफान शेख यांनी म्हटले की महानगरपालिकेकडे कचराकुंडी ची मागणी केली असून उघड्यावर कचरा टाकल्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. शिवाय याच ठिकाणी ड्रेनेज लाईनचे चेंबर असल्याने तो कचरा या चेंबरवाटे ड्रेनेज लाईन मध्ये जातो व पुढे दोन्ही बाजूने ड्रेनेज लाईन चोकअप झाल्याने पावसाचे घाण पाणी रस्त्यावर येते. त्यामुळे नागरिकांना या समस्यांच्या सामना करावा लागत आहे. तरी महानगर पालिकेने त्वरित उपाययोजना करावी अशी मागणी होत आहे.

# धर्मादाय आयुक्त कार्यालयापर्यंत पक्क्या रस्त्यासाठी ॲड. धन्नावत उपोषण करणार

**जालना । प्रतिनिधी** - सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे जाणारा रस्ता अद्यापही कच्चा, खड्ड्यांनी भरलेला आणि अपघातांना आमंत्रण देणारा ठरत असून, वारंवार निवेदने देऊन ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतरही प्रशासनाने ठोस कार्यवाही न केल्याने नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश सिताराम धन्नावत यांनी आता आक्रमक पवित्रा घेतला असून, १ जूनपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

ॲड. धन्नावत यांनी दि. २२ एप्रिल रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन त्यात नमूद केले होते की, शासकीय ग्रंथालयापर्यंतच पक्का रस्ता आहे, परंतु त्याही रस्त्याची अवस्था निकृष्ट असून त्यानंतरचा सहाय्यक धर्मादाय कार्यालयापर्यंतचा रस्ता पूर्णतः कच्चा, खड्ड्यांनी भरलेला व धोकादायक आहे.



पावसाळ्यात हा रस्ता चिखलमय होऊन दुचाकीस्वार घसरत असल्याने अपघातांची शक्यता वाढते. नागरिक, वकील आणि कर्मचाऱ्यांना अक्षरशः तारेवरची कसरत करत कार्यालयात पोहोचावे लागते. या समस्येवर मागील वर्षी मानवाधिकार आयोगानेही तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले होते, तर यावर्षी मार्च महिन्यात सहाय्यक धर्मादाय आयुक्त वि. स. मेंढे यांनीही जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून रस्ता समस्येचे गांभीर्य अधोरेखित केले होते. मात्र, इतक्या पाठपुराव्यानंतरही अद्याप कुठलीही प्रत्यक्ष कार्यवाही झालेली नाही.

या पार्श्वभूमीवर ॲड. धन्नावत यांनी २० मे रोजी पुन्हा एकदा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करत प्रशासनाच्या कुंभकर्णी झोपेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करून १ जूनपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

ॲड. धन्नावत यांच्या या इशाऱ्याची दखल घेत जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी दिनांक २६ मे रोजी महापालिका आयुक्त, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आणि जिल्हा ग्रंथालय अधिकाऱ्यांना पत्र देऊन त्वरित कार्यवाही करण्यास सांगितले आहे. मात्र, केवळ पत्रव्यवहार नको, प्रत्यक्ष रस्त्याचे काम सुरू करावे, अन्यथा १ जूनपासून आपले लाक्षणिक अटळ असल्याचा स्पष्ट इशारा ॲड. धन्नावत यांनी दिला आहे.

# रोटरी क्लब ऑफ जालनातर्फे पायाभूत शिक्षणासाठी ४१ लाखाचा ग्लोबल ग्रँट

**जालना । प्रतिनिधी** - सन १९६२ मध्ये स्थापन झालेल्या रोटरी क्लब ऑफ जालनाला प्रथमच रोटरी इंटरनॅशनलमार्फत ४१ लाख रुपयांचा भरीव ग्लोबल ग्रँट मंजूर झाला आहे. हा निधी न्यूयॉर्कमधील रोटरी क्लब ऑफ हडसन व्हॅलीच्या सहकार्याने उपलब्ध झाला असून, तो जालना एज्युकेशन फाउंडेशन (जेईएफ) च्या पढो जालना या पायाभूत शिक्षण प्रकल्पासाठी वापरण्यात येणार आहे, अशी माहिती ग्लोबल ग्रँटचे जिल्हाप्रमुख अनुप करवा यांनी दिली.

या प्रकल्पाअंतर्गत ७० ई-लर्निंग टॅबलेट्स, विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक वेबसाईट व मोबाईल ॲप्लिकेशन तयार करण्यात येणार आहे. याशिवाय शिक्षक प्रशिक्षण उपक्रम राबवले जातील व विज्ञान प्रयोगशाळेसाठी अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल. या सर्व उपक्रमांचा उद्देश ग्रामीण व उपनगरांतील विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत वाचन आणि गणिती कौशल्ये वाढवणे आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शिक्षण अधिक प्रभावी बनवणे हा आहे. गेल्या पाच वर्षांपासून जालना रोटरी क्लब हा जेईएफच्या शिक्षण क्षेत्रातील कार्यात महत्त्वपूर्ण सहकार्य करत आहे. सध्या क्लबमार्फत १८ कम्युनिटी लर्निंग सेंटर चालवले जात असून, या केंद्रांतील अप्रगत विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीत उल्लेखनीय यश मिळवले आहे. आता मिळणाऱ्या टॅबलेट्समुळे ३ हजाराहून अधिक मुलांना डिजिटल साक्षरता व आधुनिक शिक्षणसामग्रीचा लाभ मिळणार आहे. ग्रँटचा प्रस्ताव रोटरी क्लब जालनामार्फत प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्या नेतृत्वाखाली तयार करून रोटरी इंटरनॅशनलकडे सादर करण्यात आला होता. या ग्लोबल ग्रँडची सुरुवात स्व. गोविंदराम मंत्री यांनी केली होती. त्यानंतर त्यांचे बंधू मुकुंदराव मंत्री यांनी चालना दिली तर त्यांची बहीण कीर्ती सारडा यांनी अमेरिका क्लबमार्फत म ोठे योगदान दिल्याने जालना रोटरीच्या इतिहासात प्रथमच ४१ लाखाचा ग्लोबल ग्रँड मंजूर झाला आहे. प्रस्ताव मंजुरीसाठी जालना क्लबच्या ग्लोबल ग्रँट समितीचे प्रमुख सुरेश अग्रवाल, विनोद मोतीवाला, गोपाल राव, प्रमोद झांजरी, शरद लाहोटी, रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया, सचिव रवी भक्कड यांचे योगदान लाभले. रोटरी इंटरनॅशनलकडून प्राप्त झालेला हा ग्रँट जालन्यातील शिक्षण क्षेत्रातील परिवर्तनासाठी एक मैलाचा दगड ठरणार आहे. या उपक्रमामुळे भविष्यातील पिढ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध होणार असून, स्थानिक समुदायाचा सहभागही अधिक सक्रिय होईल, असा विश्वास रोटरी क्लबतर्फे व्यक्त करण्यात आला आहे.









हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.